# करुणाष्टकें

## सोमवार

ज्या संगतीनेंच विराग झाला। मनोदरींचा जडभास गेला। साक्षात्परात्मा मज भेटवीला । विसरूं कसा मी गुरूपादुकांला ।।1।। सद्योगपंथे घरी आणि येलें। अंगेच मातें पर ब्रह्म केलें । प्रचंड तो बोधरवि उदेला । विसरूं. ।।2।। चराचरीं व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची । परंपदीं संगम पूर्ण झाला। विसरूं. ।।3।। जो सर्वदा गुप्त जनांत वागे । प्रपन्न भक्ता निजबोध सांगे। सद्भक्ति भावाकरितां भुकेला। विसरूं.।।4।। अनंत माझे अपराध कोटी। नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं। प्रबोधिता तो श्रम फार झाला। विसरूं.।।5।। कांही मला सेवनही न झालें। तथापि तेणें मज उद्धरीले । आतां तरी अर्पिन प्राण त्याला। विसरूं. ।।6।।

माझा अहंभाव असे शरीरीं।

तथापि तो सद्‌गुरू अंगिकारी। नाहीं मनीं अल्प विकार झाला। विसरूं.।।7।। आतां कसा हा उपकार फेडू । हा देह ओवाळुनि दूर सोडू । म्यां एकभावें प्रणिपात केला । विसरूं. ।।8।। जया वानितां वानितां वेदवाणी। म्हणे नेति नेति तिला जे दुरूनी । नव्हे अन्त ना पार ज्याच्या रूपाला । विसरूं.।।9।। जो साधुच्या अंकित जीव झाला। त्याचा असे भार निरंजनाला। नारायणाचा भ्रम दूर केला । विसरू.।।10।।